The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
===============================================================
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
---------------------------------------------------------------------------------------------------
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024
===============================================================

# राष्ट्रसंत सेना महाराज यांच्या विचारांची प्रासंगिकता

**विनोद सखाराम बोरकर**
**संशोधक विध्यार्थी, नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी**

भारतातील सामाजिक परीवर्तनाची चर्चा करताना प्रामुख्याने संतसाहित्याची चिकित्सा झाली आणि संत साहित्याच्या संदर्भात भक्ती चळवळीचा समाजावरील विचाराचा अभ्यास झाला. या भक्ती चळवळीने भारताला केवळ संत साहित्य् दिले नाही; तर विविध जाती-धर्माच्या नावाखाली विखूरलेल्या अवघ्या भारताला भक्तीच्या एका समान धाग्यात गुंफून एका छत्राखाली आणले. संताना प्रदेश, भाषा, जातपात, यांच्या मर्यादा नसतात. सकल मानवजातीला स्व्त:च्या सर्वांगीण विकासाचा मार्ग संतानी दाखवला. या सर्व संतानी आपल्या भक्तीच्या माध्यमातून धार्मिक कर्मकांडांच्या थोतांडावर, ढोंगी-पाखंडी-दांभीक वर्तनावर संतानी हल्ला केला. सामाजिक विषमलेला संपविण्यासाठी स्थानिक भाषेतून अभंग, किर्तन, काव्यनिर्मितून सामाजिक परिचवर्तन करण्याचे काम केले. १२ वे शतक सामाजिक असमतोलाचे असले तरी या असमतोला छेद देणा-या पुनरूत्थानाचे देखील ठरले आहे. वर्णव्य्वेस्थेच्या जाळयात हतबल झालेला समाज समाजव्य्वस्था आणि राजसत्ता या दुहेरी चक्रात भरडला जात असतांनाच परिवर्तनाचा मार्ग मध्ययुगीन काळात भक्ती पंथातील संतानी स्थानिक भाषेत साहित्य् निर्मिती करून समाजात समता निर्माण करण्याचा प्रयत्न् केला. मध्युगीन भक्ती आंदोलनातील संत हे प्रामुख्याने उपेक्षित समाजातून आलेले आहेत. त्यामुळे सामाजिक विषमता, वर्णव्यवस्था, जातीभेद आणि धार्मिक, सामाजिक शोषण, सामाजिक विषमतेचे चटके, उच्च्-निच्च् भेदभाव हे सर्व त्यांनी सहन केले आहे. यासर्व संकटातून ते थांबले नाही व्यवस्था परिवर्तन करण्यासाठी त्यांनी त्यांनी स्वत:ची ज्ञानाची उन्नती केलीच. वारकरी धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्याचे ब्रीद मनाशी दृढ निश्चयाने बाळगणा-या वारकरी संप्रदायाच्या सर्वच अध्वर्युंना समाजामध्ये असणा-या विविध अनिष्ठ चाली-रुढी परंपरांना संपवायचे होते आणि त्यामुळे वाङ:मयाच्या माध्यमातून विविध संतानी विपुल साहित्यनिर्मिती केलेली दिसते. त्यातून त्यानी समाजातसुध्दा आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजाला विज्ञानवादी, समतावादी विचाराच्या माध्यमातून परिवर्तनाची दिशा देण्याचे काम केले. अभंग, किर्तन या भक्तीच्या माध्यमातून भक्ती पंथातील संतानी लोकांना समजेल त्या स्थानीक भाषेत त्यांना सामाजिक परिवर्तनाचे विचार देण्याचे काम केले. श्रीविठठल आणि भक्ती पंथातील संतानी फक्त् वर्णव्यवस्थेच्या नाही तर जातीपातींच्या सीमा मोडल्या नाही तर प्रांताप्रांताच्याही सीमा ओलाडंल्या राष्ट्रसंत सेना महाराज त्याचेच एक उदाहरण म्हणता येईल. राष्ट्रसंत सेना महाराजांनी मध्युगीन भारताला परिवर्तनाचा व विवेकाचा आरसा दाखविण्याच्या काम केले समाजातील वर्ण-व्यवस्था, अनिष्टप्रथा, कर्मकांड, यावर रोखठोक टीका करण्याचे सामर्थ्य् दाखवणारे राष्ट्रसंत सेना महाराज म्हणजे महाराष्ट् आणि उत्त्र भारतातील भक्ती आंदोलनांचा अंत:संबंध दाखवणारा राष्ट्रसंत नामदेव महाराजाचा अगोदरचा एक अत्यंत महत्वाचा पाया म्हणता येईल.

बाराव्या शतकात मध्यप्रदेशात सामाजिक विषमतेविरूध्द बंड पुकारणारे योग-कर्म, कर्मकांडाचे थोतांड नाकारणारे, जातीपाती भेदाभेद, उच्चनीच, अस्पृश्यता इत्यादी समाज विघातक प्रवत्तीला तिरालंजी देणारे पाप-पुण्य, स्वर्गनरक, मोक्ष, पुनर्जन्म् अशा अभावात्मक विचारांनतंर पायतळी तुडविणारे राष्ट्रसंत सेना महाराज होय. तसेच कीर्तन, भजन, प्रबोधन यांच्या माध्यमातून लोकांना सत्याचा व प्रेमाचा मार्ग दाखवला. त्यांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून समस्त् मानवजातीच्या कल्याणासाठी अभंगातून परिवर्तनाची दिशा समाजाच्या तळागळापर्यंत नेण्यासाठी पूर्ण भारतभ्रर सैन पंथाच्या माध्यमातून विश्वकल्याणाचे काम केले.नाभिक समाजातील राष्ट्रसंत, संत शिरोमणी सेना महाराज यांचा जन्म् ८ मार्च ११९० रोजी मध्यप्रदेश राज्यातील उमरीया या जिल्हातील बांधवगड या गावी झाला.प्रामुख्याने व्यवस्था परिवर्तनाची भाषा बोलणारे परिवर्तनाचे वादळ म्हणजेच एक धगधगता अंगार जन्माला आले. त्यांच्या वडिलांचे नाव देविदास वै| तर आईचे नाव प्रेमकुंवरबाई देविदास वै| असे होते. राष्ट्रसंत सेना महाराजांचे वडिल हे तत्कालीन राजा रामराया आदित्य् यांच्याकडे मंत्री मंडळातील एक चाणाक्ष्, कर्तुत्वान, नितिमान व प्रभावशाली मंत्री होते. उमरीया या जिल्हातील बांधवगड या गावी झाला. प्रामुख्याने व्यवस्था परिवर्तनाची भाषा बोलणारे परिवर्तनाचे वादळ म्हणजेच एक धगधगता अंगार जन्माला आले. त्यांच्या वडिलांचे नाव देविदास वै| तर आईचे नाव प्रेमकुंवरबाई देविदास वै| असे होते. राष्ट्रसंत सेना महाराजांचे वडिल हे तत्कालीन राजा रामराया आदित्य् यांच्याकडे मंत्री मंडळातील एक चाणाक्ष्, कर्तुत्वान, नितिमान व प्रभावशाली मंत्री होते. राष्ट्रसंत सेना महाराजांनी समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा, कर्मकांड, दैववाद, शोषण, विषमता, जातीभेद, मानवी मुल्य, मानवी विकास व उत्कर्षावच्या आड येणा-या अमानवी प्रथेच्या विरोधात कणखर दंडथोपटून बंड पुकारण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. निद्रिस्त् समाजाला गदगद हलवून, खडबडून जागे करण्याचे काम त्यांनी केले.

**करीता लबाडया, पोसी रांडा मुले |**
**इतरांशी झोले देऊनीया ||**
**बोलू जाता सांगे बम्हज्ञान गोष्टी |**
**अंतरी कपटी बक्क् जैसा ||**
**शास्त्री चतुर, वक्ता तो पंडीत |**
**इतरा खंडीत करीतसे |**
**सेना म्हणे ऐसा, सत्य ताना खळ |**
**आहे जो चांडाळ विटाळ माना**

राष्ट्रसंत सेना महाराज आपल्या या अभंगातून म्हणतात, कर्मठ विचाराची लोक समाजाचा अज्ञानाचा फायदा घेत आहेत. त्यांनी निर्माण केलेली कर्मकांड, अंधश्रध्दा यामध्ये समाजाला गुंतवून ठेवून आर्थिक लुबाडणूक करणे. राष्ट्रसंत सेना महाराज हे बहुभाषपंडीत होते, त्यांचे अनेक भाषांवर विलक्षण प्रभुत्व होते. या अभ्रंगातून एकंदरीत समाजाची कशा प्रकारे लुट करून, धर्माचे थोतांड सांगुन समाजाची फसवणून केली जात आहे. जातीविरहीत व शोषणमुक्त् समाजाच्या निर्मितीसाठी त्यांनी भारतभ्रमण सुरु करून अव्याहतपणे मानवतेच्या संगोपण, संवर्धन व संरक्षणासाठी

अनेक भाषा त्यांनी अवगत केल्या आणि त्या माध्यमातून कृतीयुक्त् पध्दतीने समाजाचे प्रबोधन करण्याचे कार्य त्यांनी केले. मराठी भाषा आत्मसात करुन मराठी भाषेवर इतके प्रभूत्व् मिळविले की, मराठी भाषेत त्यांनी अनेक उत्कृष्ठ अभंगाची निर्मिती केली. त्याच बरोबर पंजाबी, हिंदी, राजस्थानी इत्यादी भाषा अवगत करून त्यात अनेक अभ्ंगाची रचना केली.

**सात पिडियाँ तार दे |**
**नारी होय सुजाण ||**
**सेना सिच्छा खूप दो |**
**खूब बने बलवान ||**

महात्मा फुले ज्याप्र्माणे म्हणत एक पुरुष जर शिकला तर एक कुंटूंब शिक्षीत होईल आणि एक स्त्री जर शिकली तर एक समाज शिक्षीत होईल. त्याप्रमाणे राष्ट्रसंत सेना महाराज आपल्या अभंगातून १२ व्या शतकात स्त्रीयांच्या शक्ती कल्पना देत आहेत. त्याकाळात स्त्रीयांच्या स्वातंत्रय्, समता हे विचार समाजाला देण्याच काम राष्ट्रसंत सेना महाराज यांनी केले आहे.

**नामदेव, कबीर, त्रिलोचन साधन सेन तेरे |**
**कह रविदास सूनहरे संतहू |**
**हरी जीऊ ते सर्भे सरे ||**

उत्त्र भारतातील संत रविदासांनी सुध्दा सेनाजी महाराजांविषयी असणारा आदरभाव आपल्या अभंगातून व्यक्त केल्याचे दिसून येते. राष्ट्रसंत सेना महाराज स्वत: सैन पंथाची स्थापना करून सामाजिक परिवर्तनासाठी भारतभ्रमन केले. त्याचं बरोबर वारकरी चळवळीत स्व्त:ला झोकून देवून चार वर्णाच्या गराडयात आडकलेला हा समाज व त्यातील जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी त्यांचा अविरत लढा होता. कर्मठ उच्चवर्णीयांनी निर्माण केलेली उच्च्-निच्च् जातीभेद ही परंपरा मोडीत काढण्यासाठी त्यांचा महत्त्पूर्ण संघर्ष होता.जे मानवा-मानवात उच्च्-निच्चता समजतात त्यांना उदेश् ुन राष्ट्रसंत सेना महाराजांनी खडा सवाल टाकतात.मानवतेची घडी विस्कटणारे व त्याच विस्कळीतपणात परमेश्वर दाखविणा-या सांगतात की जाती कुळाने भक्ती श्रेष्ठत्व् ठरत नसून त्यांच्या श् ुध्दभावावर व कर्मावर ठरते आणि परमेश्वर हा व्यक्तीच्या चांगल्या आचरणावर व सतकर्मावर हेच मर्म त्यांनी सांगितले. राष्ट्रसंत सेना महाराजांच्या अशा विविध समतामुलक समाज निर्मितीस पुरक असलेल्या अभंगाचा समावेश शिख धर्मातील गुरुग्रंथसाहिब या पवित्र ग्रंथात करून त्यांना मानाचे स्थान प्राप्त् करून दिले आहेत. **गुरु ग्रंथ साहिब या ग्रंथामध्ये ६६५ क्रंमाकाच्या पानावर ६ नंबरचा जो अभं आहे, तो अभंग राष्ट्रसंत सेना महाराज यांचा आहे.**

**धूप दीप घ्रित साजि आरती ||**
**वारने जाउ कमलापती ||१||**
**मंगला हरि मंगला ||**
**नित मंगलु राजा रामराई को ||२||**
**ऊतमु दीअरा निरमल बाती ||**

**तुंही निरंजन कमलापती ||३||**
**रामा भगति रामात्रदु जाने ||**
**पूरन परमात्रंदु बखानै ||४||**
**मदन मूरति भै तारी गोविंदे ||**
**सैनु भणै भजु परमात्रदे ||५||**

आताच्या समाजात संत हे प्रसिध्द, पैसा, मोह-माया, लोकांमध्ये अध् श्रध्दा विचार निर्माण करणारे होत आहेत. पण राष्ट्रसंत सेना महाराज १२ व्या शतकात कोणतीही दळणवळणाची सुविधा नसताना भारतभम्रण करूण समाजात समातावादी विचार राबविण्याचे काम केले. राष्ट्रसंत सेना महाराजाचे जीवन म्हणजे जणू विरक्ती आणि भक्ती यांचा अथांग सागरच त्यांनी अठरा राज्यात फिरून सैन पंथाच्या माध्यमातून परिवर्तन चळवळ भक्कम करून अन्याय,अत्याचार, अंधश्रध्दा यावर प्रहार, वार करुन सैन पंथाची ही संकल्पना दृढ केली. स्त्रीचा सन्मान झाला पाहिजे, कामगारांच्या हाताला काम मिळाले पाहिजे यासाठी त्यांचा महत्त्वाचा लढा होता.ज्यावेळी त्यांच्या राज्याला कोड हा आजार झाला होता. त्यावेळी चमत्काराने, नवस-साया-याने तो कोड बरा होणार नाही तर आयुर्वेदाच्या शास्त्राने विज्ञानाच्या आधारावर निसर्गोच्या अभ्यासाने नाहीशा करण्याचा प्रयत्न् त्यांनी केला म्हणून ते जगातील चर्म्रोगावरील औषधाचे जनक ठरले. अशा परिवर्तनवादी, विज्ञानवादी समाज सुधारकाच्या राष्ट्रसंताच्या विचारांना नष्ट करण्याचा प्रयत्न् इथल्या प्रथापित व्यवस्थेने केला आहे. असा अखिल मानव जातीसाठी लोककल्याणकारी असणारा संदेश त्यांनी जनमाणासाला दिला. पर्यावरणाचे नुकसान करणा-या व्यक्तीचा धिक्कार करणारे बाराव्या शतकातील पहिले संत म्हणजे राष्ट्रसंत सेना महाराज होत. एंकदरीत पर्यावरण संवर्धनचा संदेश त्यांनी जनमानसाला देण्याचा प्रयन्त केला. कुठे तरी महाराष्ट्र, मध्यप्रदेश, कर्नाटक, आणि पंजाब यांना जोडणरा समान धागा म्हणजे राष्ट्रसंत नामदेव महाराज, राष्ट्रसंत सेना महाराज, राष्ट्रसंत महात्मा बसवेश्वर होत. माणसातील माणसूकी नष्ट झालेल्या माणसाला जोडण्याचे काम राष्ट्रसंत सेना महाराजांनी केले. राष्ट्रव्यापी, विश्वव्यापी, लोककल्याणकारी काम, शेतकरी , कष्टकरी, श्रमकरी, मंजूर महिलांच्या शोषणमुक्तीचे काम राष्ट्रसंत सेना महाराजांनी केले. आपल्या जीवन कार्यात त्यांनी तथागत बुध्दांना,भारतीय स्वातंत्र्याला, भारतीय संविधानाला, समतामुलक समाज निर्मितीस अपेक्षित असलेलं कार्य त्यांनी केले.एकंदरीत त्यांनी मानवीय हिताचे काम त्यांनी केले.या महान विवेकी विचारधारा जर समजून घेतली तर संताच्या विचारधारेवर आधारीत राष्ट्रव्यापी व एक विश्वव्यापी वारकरी, सैन चळवळ उभी राहिली. राष्ट्रसंत सेना महाराज यांचे विचार हे १२ व्या शतकात समाजावादी, विज्ञानवादी, मानवीकल्यासाठी होते. त्यांनी आपल्या साहित्यातून मानव कल्याणासाठी काम केले आहे. हे त्यांच्या साहित्यातून दिसून येते. कोणत्या मोह-माया अपेक्षा न ठेवता आपल्या साहित्यातून प्रबोधन करण्याचे काम केले आहे. आजच्या २१ शतकात पण मोठया प्रमाणात समाज अंधश्रध्दा, व्यसनधीनता, कर्मकांड, भष्टाचार, आधुनिक वर्णव्यवस्था, या गुंतलेले आहे. त्यामुळे राष्ट्रसंत सेना महाराज यांचे विचार जे

१२ शतकात मांडले होते. ते आज पण २१ व्या शतकात लागु पडतात. त्या विचाराची प्रांसगिता समाजाला आज पण आहे.

**संदर्भ् ग्रंथ -**

१) मध्ययुगीन भारताचा इतिहास - सतिश चंद्र
२) मध्ययुगीन भारताचा इतिहास - डॉ. अनिल कठारे
३) संत पंथ तंत्  - शि. मा. माटे
४) नामदेव गाथा - महाराष्ट्र शासन
५) महाराष्ट्रातील संत परंपरा (सन २००३) डॉ. आरती देशपांडे
६) पाच संप्रदाय (सन २००८) ले. डॉ. र. रा. गोसावी
७) वारकरी संप्रदाय : उदय व विकास (सन १९७५) ले. भा.प. बहिरट
८) भागवतभक्त सेनाजी (सन १९४५) ले. प्रा. भा. कृ. मोरे
९) संत सेना महाराज अभंग गाथा (सन २००१) ले. श्रीराम गुळवणे
१०) संत सेना महाराज अभंग गाथा (सन २००१) ले. रामचंद्र शिंदे
११) संत नामदेव (सन २०१०) ले. डॉ.हे.वि. इनामदार
१२) वारकरी संप्रदाय आणि विज्ञान युग (सन १९९०) ले. निरंजन घाटे जय प्रकाशन
१३) दै. लोकसत्ता
१४) दै. महाराष्ट्र टाईम्स
१५) डॉ. राहु ल हांडे यांचा लेख  दै. सकाळ
१६) श्री प्रमोद नैकले विर्दर्भ् २४ वार्ता
१७) महायोध्दा संत सेना - सुभाष एस. बोरकर
१८) वारकरी संप्रदायाचे शिरोमणी संत सेना महाराज- सागर निंबोकार
१९) संत सेना महाराज आणि नाभिक समाज एक आकलन- भीमराव जगताप
२०) संतांचे सामाजिक व धार्मिक विद्रोह - प्रा. गौतम निकम
२१) श्री सेना महाराज चरित्र प्रा. र.रा. गोसावी सौ. वीणा गोसावी सारथी प्रकाशन
२२) श्री. सुनिल धर्माची आहिरे -श्री संत सेना महाराज चरित्र आणि वाङ:मय पीएच.डी शोधप्रबंध्
२३) प्रा. लक्ष्मण कोंडावार सर नांदेड यांचा लेख